## वेचक

### महिनाभरानंतर पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत

**मोखाडा :** गेल्या महिनाभरापासून इंधनटंचाईने त्रस्त असलेल्या मोखाडा तालुक्यातील नागरिकांसाठी अखेर दिलासादायक बातमी आली आहे. मोखाड्यातील इंडियन ऑईलच्या पेट्रोल पंपावर नवीन पेट्रोल आणि डिझेलचा साठा उपलब्ध झाल्यानंतर नियमित इंधनविक्रीला सुरुवात झाली आहे. इंधनटंचाईमुळे वाहनचालक, शेतकरी, व्यापारी आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकांना तब्बल २० किलोमीटर दूर जव्हार येथे जाऊन इंधन भरावे लागत होते, तर काहींना तासन्तास रांगेत उभे राहूनही इंधन मिळत नव्हते. नवीन इंधनसाठा दाखल होताच पेट्रोल पंपावर वाहनधारकांनी मोठी गर्दी केली. इंधन उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, वाहतूक आणि दैनंदिन व्यवहार पुन्हा सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पेट्रोल पंप प्रशासनानेही पुढील काळात इंधनाचा नियमित पुरवठा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेली इंधनटंचाईची समस्या आता दूर होण्याची चिन्हे दिसत आहेत.

### तलासरीत साडेसात लाखांचा गुटखा जप्त

**तलासरी :** गुजरातमधून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा प्रतिबंधित गुटखा पकडण्यात तलासरी पोलिसांना मोठे यश आले आहे. मंगळवारी पहाटे राष्ट्रीय महामार्गावर कारवाई करत पोलिसांनी सुमारे ७.४० लाख रुपयांचा गुटखा आणि कार जप्त केली असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुजरातमधून वेगनार कारमधून गुटखा भिवंडीकडे नेला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार ठक्कर बाप्पा विद्यालयाजवळ सापळा रचून मुंबईकडे जाणारी एमएच-०५ डीके-४१६४ क्रमांकाची कार अडविण्यात आली. तपासणीदरम्यान कारमधून सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. गुटखा आणि वाहन असा एकूण ७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी हमजा इरफान मेमन आणि अशरफ ईशाभाई मेमन , दोघेही भिवंडी येथील रहिवासी, यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. महाराष्ट्रात गुटख्यावर बंदी असली तरी गुजरातमध्ये बंदी नसल्याचा फायदा घेत चोरट्या मार्गाने मोठ्या प्रमाणात गुटख्याची तस्करी केली जात असल्याचे वारंवार समोर येत आहे. त्यामुळे अशा अवैध वाहतुकीवर अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची मागणी होत आहे.

### बदलीनंतरही शिक्षकांकडे बीएलओची जबाबदारी

**मोखाडा :** मोखाडा तालुक्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत सध्या विचित्र परिस्थिती निर्माण झाली असून, बदली होऊन दुसऱ्या शाळेत रुजू झालेल्या अनेक शिक्षकांकडे पूर्वीच्या गावातील बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) पदाची जबाबदारी कायम असल्याने अध्यापनासह निवडणूक कामांचा दुहेरी ताण वाढला आहे. यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्राथमिक शिक्षकांना दररोज विद्यार्थ्यांचे अध्यापन, शैक्षणिक उपक्रम, प्रशासकीय कामे आणि विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करावी लागते. त्याचवेळी दुसऱ्या गावात जाऊन मतदार यादी अद्ययावत करणे, निवडणूक आयोगाच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असल्याने त्यांची मोठी कसरत होत आहे.

# शासनाच्या योजनांमध्ये महापालिकेचा खोडा

## आमदार दुबे-पंडित विधानसभेत आक्रमक

◆ **विरार (प्रतिनिधी) :**

भ्रष्टाचार, विकासकामांतील दिरंगाई, निधीच्या वापरातील अनियमितता आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे वसईकरांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी विधानसभेत केला. विविध योजनांसाठी शासनाचा कोट्यवधी रुपयाचा निधी असतानाही महापालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे अनेक प्रकल्प पूर्ण होत नाहीत. परिणामी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी सुद्धा त्यांनी केली.

अधिवेशनामध्ये उशिरापर्यंत सुरू असलेल्या चर्चेत बोलताना त्यांनी सांगितले की, महायुती सरकारने विकासकामांसाठी निधी, प्रशासकीय मंजुरी आणि धोरणात्मक पाठबळ दिले असतानाही स्थानिक पातळीवरील निष्क्रिय कारभारामुळे अनेक महत्त्वाचे प्रकल्प रखडले

आहेत. विरोधकांनी काही महानगरपालिकांमधील भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला; मात्र वसई-विरार महानगरपालिकेतील कथित गैरव्यवहारांकडे दुर्लक्ष झाल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.यावेळी त्यांनी वसईतील पाणीटंचाईचा प्रश्न विशेषत्वाने उपस्थित केला. खोलसापाडा धरणातील पाणी शंभर टक्के आरक्षित करण्यास शासनाची तयारी असूनही निधीअभावी महानगरपालिकेने प्रस्ताव पुढे न नेल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच जिल्हा परिषदेच्या ११६ शाळा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाल्यानंतरही त्या चालविण्यासाठी निधी नसल्याचे सांगितले जात असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

वसईची ऐतिहासिक ओळख असलेल्या बावखळांच्या संरक्षणासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याचे प्रशासन सांगत असल्याबरोबरच, एमएमआरडीएकडून हजारो कोटी रुपयांच्या विकासकामांची तयारी असूनही भू-संपादन प्रक्रियेतील विलंबामुळे रस्ते व पुलांची अनेक कामे रखडल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.अमृत २.० योजनेअंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून मोठा निधी उपलब्ध झाला असतानाही त्याचे श्रेय स्थानिक सत्ताधारी घेत असल्याची टीकाही त्यांनी केली. नालेसफाईसाठी भाडेतत्त्वावर घेतलेल्या यंत्रसामग्रीच्या कंत्राटात सुमारे ३० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचा आरोप करत, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या तुलनेत वसई-विरारमध्ये यंत्रसामग्रीसाठी अनेकपटीने अधिक दर दिल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.एसटीपी प्रकल्पांमधील विलंब, निकृष्ट दर्जाची कामे आणि गंभीर घटनांशी संबंधित कंत्राटदारांना पुन्हा कामे देण्याच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत त्यांनी या प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी केली. तसेच आचोळे येथील मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासाठी शासनाने २५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करूनही प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रकल्प रखडल्याचा आरोप त्यांनी केला.भाषणाच्या शेवटी आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी २००९ ते २०२६ या कालावधीत वसई-विरार महानगरपालिकेला देण्यात आलेल्या निधीच्या प्रत्येक रुपयाचा लेखाजोखा तपासून सर्व खर्चाची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली.

# गायरान जमिनीवर रासायनिक कचऱ्याचा साठा

## भंगारामुळे पर्यावरणाला धोका; चौकशीची मागणी

◆ **बोईसर (प्रतिनिधी) :**

पाम ग्रामपंचायत हद्दीतील बोईसर-नवापूर मार्गावरील गायरान जमिनीवर औद्योगिक घनकचऱ्याची बेकायदेशीर साठवण करून त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असुन पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यावर गंभीर संकट निर्माण झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

या ठिकाणी रासायनिक द्रव्यांची पिंपे, प्लास्टिकच्या गोण्या आणि विविध प्रकारचे औद्योगिक भंगार मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे. घातक रसायने जमिनीत झिरपल्याने जमिनीची सुपीकता धोक्यात आली असुन परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. तसेच ज्वलनशील साहित्यामुळे आग लागण्याचा धोकाही निर्माण झाला आहे.

> "गायरान जमिनीवरील अवैध भंगार साठवणुकीस कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही."
> – भागवत कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी, पाम

दरम्यान, रासायनिक भंगाराची हाताळणी करणाऱ्या कामगारांकडे कोणतीही सुरक्षा साधने नसल्याचे निदर्शनास आले आहे. हातमोजे, मास्क, सुरक्षा बूट यांशिवाय कामगारांकडून धोकादायक कचरा हाताळला जात असल्याने त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. काही कामगारांच्या माहितीनुसार, 'गुप्ता' नावाच्या व्यक्तीकडून आरती कंपनीतून आणण्यात येणारे रासायनिक भंगार या ठिकाणी साठवले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, या दाव्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. गायरान जमिनीवरील अवैध साठा तातडीने हटवून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**ग्रामस्थांच्या मागण्या**

- गायरान जमिनीवरील अवैध साठा तत्काळ हटवावा.
- पर्यावरण विभागाकडून सखोल चौकशी करावी.
- दोषींवर कठोर कारवाई करावी.
- परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करावे.

# हार्दिक राऊतांच्या पराभवाने 'मामा' हरले... आणि जिंकलेही!

## जिल्हा बँक निवडणुकीनंतर नातेसंबंधांची रंगली चर्चा

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या इतर मागासवर्गीय मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचे माजी नगरसेवक हार्दिक राऊत यांचा झालेला पराभव हा केवळ एका उमेदवाराचा पराभव न ठरता वसई-विरारच्या राजकारणातील कौटुंबिक समीकरणांचीही मोठी चर्चा ठरली आहे. राऊत यांच्या पराभवामुळे त्यांचे मोठे मामा तथा माजी महापौर राजीव पाटील यांना राजकीय धक्का बसल्याची चर्चा असताना, दुसरे मामा व विद्यमान महापौर अजीव पाटील मात्र बहुजन विकास आघाडीसोबत ठाम राहिल्याने विजयी जल्लोषात सहभागी झाले.

यंदाची जिल्हा बँकेची निवडणूक भाजप, शिवसेना आणि बहुजन विकास आघाडीतील बदलत्या राजकीय समीकरणांमुळे विशेष गाजली. भाजपचे आमदार किसन कथोरे यांनी भाजप

समर्थित महायुती परिवर्तन पॅनलविरोधात स्वतंत्र भूमिका घेत बहुजन विकास आघाडी आणि राष्ट्रवादी (शप गट) गटाशी हातमिळवणी केली. दुसरीकडे शिवसेनेचे बाबाजी पाटील यांनी भाजपचे माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांना साथ देत पक्षांतर्गत वेगळी भूमिका घेतली. निवडणुकीनंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी "हम साथ साथ है" असे वक्तव्य केल्याने अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीसाठी भाजपकडून नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. या सर्व घडामोडींमध्ये हार्दिक राऊत यांची उमेदवारी विशेष चर्चेचा विषय ठरली. बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांचे निकटवर्तीय आणि माजी महापौर राजीव पाटील तसेच विद्यमान महापौर अजीव पाटील यांचे भाचे असलेल्या राऊत यांनी बविआची साथ सोडून भाजप समर्थित महायुती परिवर्तन पॅनलमधून निवडणूक लढवली होती. राजकीय वर्तुळात अशीही चर्चा होती की, उमेदवारी अर्ज भरल्यानंतर अजीव पाटील यांनी हार्दिक राऊत यांना अर्ज मागे घेण्याचा सल्ला दिला होता. मात्र, माजी महापौर राजीव पाटील यांच्या पाठबळामुळे त्यांनी निवडणुकीच्या रिंगणात कायम राहण्याचा निर्णय घेतला. अखेर निकालात त्यांचा पराभव झाला आणि त्यानंतर राजकीय चर्चांना अधिक उधाण आले.

# स्थानिक युवकांचे प्रशिक्षण वेगात

## वाढवण बंदर प्रकल्पासाठी निर्णय

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

देशातील महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पासाठी स्थानिक युवकांना रोजगारक्षम बनविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'वाढवण बंदर कौशल्य विकास कार्यक्रमाला' आता अधिक गती मिळणार आहे. वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (व्हीपीपीएल) आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत युवकांच्या कौशल्यविकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

बैठकीत महाराष्ट्र शासनाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा, व्हीपीपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौरव दयाल, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी, पालघर जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, व्हीपीपीएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवीश कुमार सिंह यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> "व्हीपीपीएल, महाराष्ट्र शासन आणि उद्योग क्षेत्रातील भागीदारांच्या संयुक्त प्रयत्नातून प्रकल्पासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार केले जात आहे. त्यामुळे स्थानिक युवकांना गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील."
> – गौरव दयाल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, व्हीपीपीएल

यावेळी सादर करण्यात आलेल्या 'मॅनपॉवर स्टडी प्रोजेक्शन्स रिपोर्ट'मध्ये प्रकल्पाच्या विविध टप्प्यांमध्ये लागणारे मनुष्यबळ, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक तांत्रिक कौशल्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सध्या आयटीआय वाणगाव आणि आयटीआय पालघर येथे विशेष प्रशिक्षण तुकड्या सुरू करण्यात आल्या असून फिटर फॅब्रिकेशन, डिजिटल मेजरमेंट, असिस्टंट इलेक्ट्रिशियन आणि मॅन्युअल मेटल आर्क वेल्डिंग या अभ्यासक्रमांमध्ये प्रत्येकी ३० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

मनीषा वर्मा यांनी बदलत्या औद्योगिक गरजांनुसार कौशल्य विकास व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# बुलेट ट्रेनच्या सर्व्हिस रोडने अडवला नैसर्गिक नाला

◆ **सफाळे (वार्ताहर) :**

बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या सर्व्हिस रोडच्या बांधकामामुळे माकुणसार ग्रामपंचायत हद्दीतील विरावाडी परिसरातील नैसर्गिक नाल्याचा प्रवाह अडल्याने पहिल्याच जोरदार पावसात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याची गंभीर घटना घडली आहे. त्यामुळे माकुणसार पूर्व भागातील शेतजमिनी जलमय झाल्या असून शेतकरी व दुग्ध व्यवसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**'सर्व्हिस रोड' ठरला जलअडथळा**

- नैसर्गिक नाल्यावर केवळ दोन लहान पाईप टाकून रस्ता.
- पहिल्याच पावसात शेतजमिनी जलमय.
- गोठ्यातील जनावरांच्या चाऱ्याचे नुकसान.
- शेतकरी व ग्रामस्थांकडून तातडीच्या उपाययोजनांची मागणी.

रामबाग ते रोठे येथील प्री-कास्ट यार्डला जोडणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या समानांतर सर्व्हिस रोडसाठी विरावाडी येथील सुमारे ३० ते ३५ फूट रुंद नैसर्गिक ओहळावर केवळ दोन लहान पाईप टाकून रस्ता उभारण्यात आला आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचारा पूर्णपणे विस्कळीत झाला असून हा रस्ता पाणी अडविणाऱ्या बांधासारखा ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.पहिल्याच पावसात परिसरात एक ते दीड फूट पाणी साचल्याने अनेक शेतांमध्ये पाणी घुसले. शेतकरी प्रशांत पाटील यांच्या गोठ्यात गुरांसाठी साठवलेले गवत पूर्णपणे भिजल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले. पावसाचा जोर वाढल्यास आणखी मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## तारापूर एमआयडीसीत अग्निसुरक्षा प्रशिक्षण

**पालघर :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागांतर्गत नागरी संरक्षण दल, पालघर जिल्ह्याच्या वतीने बोईसर विधानसभा क्षेत्रातील स्वयंसेवकांसाठी तारापूर एमआयडीसी अग्निशमन केंद्रात अग्निसुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन विषयक विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे स्वयंसेवकांना आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. पालघर जिल्हा उपनियंत्रक काशिनाथ आर. कुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली व बोईसर विभागीय क्षेत्ररक्षक नरेश अनंत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या प्रशिक्षणात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी प्रथम प्रतिसादकाची भूमिका, बचावकार्याची कार्यपद्धती तसेच आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची आवश्यक खबरदारी याविषयी मार्गदर्शन केले. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक उद्योगांचा विचार करून स्वयंसेवकांना अत्याधुनिक अग्निशमन उपकरणांचा वापर, उंच इमारतींमधील बचावकार्य, नियंत्रण कक्षाला अचूक माहिती देण्यात आली. प्रशिक्षणासाठी स्टेशन ऑफिसर वाय. व्ही. मोटे, उप अग्निशमन अधिकारी पी. बी. पाटील, प्रमुख अग्निशमन विमोचक पी. सी. राऊत व आर. आर. जाधव यांनी मार्गदर्शन केले. मास्टर ट्रेनर गौरव पाटील, तृप्ती वझे, सुषमा जाधव, प्रिया पाटील तसेच नागरी संरक्षण दलाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर नोटिस**

**रत्नागिरीचे मे. नायब तहसिलदार सो., रत्नागिरी यांचे न्यायालयात**

**कुळवहिवाट दावा नं. ६/२०२६**

**श्री. जगन्नाथ लक्ष्मण पवार**
उ.व.सु.- ७५, व्यवसाय - शेती,
रा.घर नं.०४, हनुमान रोड, दत्त दर्शन, को-ऑप हाऊसिंग सोसायटी, मराठी शाळाजवळ, चोळेगाव, ठाकुर्ली (पूर्व), कल्याण, टिळकनगर, ठाणे - ४२१ २०१ सध्या रा.घर नं.२७०, मु. वाटद, पो. खंडाळा, ता.जि.रत्नागिरी. ४१५ ६१३ **-अर्जदार**

**- विरुद्ध -**

**१) कृष्णकांत नारायण भडसावळे**
उ.व.सु.- ८५, व्यवसाय - शेती,
रा. रा.मु.पो. वाटद, भडसावळेनगर,
ता. जि. रत्नागिरी. ४१५ ६१३
**२) शरद नारायण भडसावळे**
उ.व.सु.- ८३, व्यवसाय - शेती,
रा. मल्हार पॅलेस बिल्डिंग, ब्लॉक नं.४, तळमजला, कस्तुरी प्लाझा समोर, मनपाडा रोड, डोंबिवली (पू.),
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१ २०३
**३) मनोज अनंत भडसावळे**
उ.व.सु.- ७०, व्यवसाय - शेती,
रा. पठाण चाळ, ओशिवरा, जोगेश्वर (प.),
जि. रत्नागिरी.- ४१६७०१
**४) सुशिला श्रीकांत भडसावळे**
उ.व.सु.- ८१, व्यवसाय-गृहिणी/शेती,
रा.मु.पो. वाटद, भडसावळेनगर,
ता.जि. रत्नागिरी.- ४१५ ६१३
**५) श्वेता संतोष मुकादम**
उ.व.सु.- ५२, व्यवसाय-गृहिणी/शेती,
रा.मु.पो. वाटद, डंबरवठार,
ता. जि. रत्नागिरी ४१५ ६१३
**६) स्वाती गजानन परांजपे**
उ.व.सु.- ४९, व्यवसाय-गृहिणी/शेती,
रा.मु.पो. नेवरे, ता.जि.रत्नागिरी. - ४१५ ६२०
**७) संतोष रामचंद्र भडसावळे**
उ.व.सु.- ५७, व्यवसाय- नोकरी,
रा.आर. बी./१०७, अर्जुन दर्शन सोसायटी, आयरेरोड, डोंबिवली (पू.)
ता. कल्याण. जि.ठाणे - ४२१ २०३
**८) छाया माधव निमकर**
उ.व.सु.- ६२, व्यवसाय-गृहिणी,
रा. गोदावरी कृपा, दुसरा मजला, कांदिवली रोड, डोंबिवली (पू.)
ता. कल्याण, जि.ठाणे ४२१ २०३
**९) उत्तरा उल्हास पुराणिक**
उ.व.सु.- ५९, व्यवसाय-गृहिणी,
रा. राजयोग सोसायटी, सुनिल नगर, इंद्रप्रस्थ बंगल्याजवळ, डोंबिवली (पू.),
ता. कल्याण, जि.ठाणे ४२१ २०३
**१०) सुवर्णा मिलिंद कोकजे**
उ.व.सु.- ४९, व्यवसाय-गृहिणी,
रा. शास्त्री चाळ, फाटक हायस्कूलजवळ, परटवणे भाग, सुभाष रोड,
ता. जि. रत्नागिरी.- ४१५ ६१२
**११) अपर्णा दत्तात्रय धुरी**
उ.व.सु.- ६७, व्यवसाय-गृहिणी,
रा.ए/२/१०३, रुतु इस्टेट, पाटील वाडा, घोडबंदर रोड, ठाणे (प) - ४०११०७
**१२) अक्षदा आनंद भडसावळे**
उ.व.सु.- ६२, व्यवसाय-गृहिणी,
रा. पुजारी सदन, प्लॉट नं.२१२, रूम नं.९, पहिला मजला, पाटील गल्ली, चुनाभट्टी, मुंबई-४०० ०२२
**१३) मधुरा आनंद भडसावळे**
उ.व.सु.- ३२, व्यवसाय-गृहिणी,
रा. पुजारी सदन, प्लॉट नं. २१२, रूम नं.९, पहिला मजला, पाटील गल्ली, चुनाभट्टी, मुंबई -४०० ०२२
**- सामनेवाले**

ज्याअर्थी, उपरोक्त अर्जदार यांनी सामनेवाला नं. १ ते १३ यांचे विरुध्द **गाव मौजे वाटद, ता. जि. रत्नागिरी येथील स.नं.२०४, हि.नं.१८, एकुण क्षेत्र ०-२२-०० गुंठे, आकार ०-१२** या जमीन मिळकतीचे संदर्भात मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० (ब) अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तुम्ही सामनेवाला नं. १ ते १३ याना नोटिस काढूनही नोटिशीची बजावणी पूर्णतः झालेली नाही. वरनमुद सामनेवाला यांचे सध्याचे रहिवासाचा पत्ता अर्जदार यांस माहित नाही. सबब सदर दाव्याचे कामी जबाब देणेसाठी तुम्हास या जाहिर नोटिशीव्दारे कळविण्यात येते की, दि.१३/०७/२०२६ रोजी **सकाळी ११:००** वाजता न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे व आपण स्वतः अगर आपल्या वकिलांमार्फत सदर तारखेला हजर रहावे व आपले म्हणणे सादर करावे.

उपरोक्त दिवशी तुम्ही स्वतः अगर वकिलांमार्फत मे. न्यायालयात हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घेण्यात यावी.

आज दि.३० माहे जून सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी नोटिस दिली.

**ठिकाण - रत्नागिरी**
**दिनांक - ३०/०६/२०२६**

**सही/-**
**मा. नायब तहसीलदार सो. रत्नागिरी**

**PUBLIC NOTICE**

To
Mr. Prakashchandra Hiralal Desar Rana
Shri Sai Siddhi Co-OP Housing Society Ltd.Ghatkopar (West) Mumbai 400086
Whereas the developer has filed the application before competent authority at Bandra No.8, for unauthorized structure which is delipeted condition and applied for removal and demolition which is pending in competent authority No.8 at Bandra SRA office. And take notice that you remain present in the said office between 11am to 5pm. On 06/07/2026. Otherwise application decide in your absence **Sd/-**
Place:- Mumbai **Shailesh Shukla**
**Advocate High court**
Krishna Kunj, Bldg. No.4, Room No.7, Sanghani Estate, L.B.S. Road, Ghatkopar (W) Mumbai – 400 086.
Mobile No.9324924882

**जाहिर नोटीस**
**अपिलकारतर्फे वकील ॲड.एच.एस. तारी**
**नेमलेली तारीख - 09/07/2026**
**कुडाळ येथील मे. उपविभागीय अधिकारी साहेब, यांचे न्यायालयात**
**आर.टी.एस. अपिल क्र. ०४/२०२६**
मिलींद मोरेश्वर सामंत वगैरे .....**अपिलकार**
**विरुद्ध**
बलराम गोविंद सामंत वगैरे ......**सामनेवाले**
**सामनेवाले क्र. १२) सुमन सुरेश सरनाईक,** राहणारः ओ-६०२, द रेसिडेन्सी, विघ्नेश्वर नगर रोड, उमिया माता मंदिर जवळ, रेमिल टॉवर जवळ, गोरेगांव (पुर्व), मुंबई, पिन कोड नं. ४०००६३.
**सामनेवाले क्र. १३) सुजाता विष्णु सामंत, सामनेवाले क्र. १४) सुचेता विष्णु सामंत,** सामनेवाले क्र. १३ व १४ राहणारः बी-४, दुसरा मजला, आम्रपाली सोसायटी, तुरेल पाखाडी रोड, मालाड (पश्चिम), मुंबई, पिन कोड नं. ४०००६४.
या जाहिर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, अपिलकार यांनी प्रस्तुतचे अपिल हे मे. मंडळ अधिकारी साहेब, मालवण यांचे न्यायालयाने फेरफार क्र. १०९३ चे कामी दिनांक २०/०६/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाविरुद्ध दाखल केलेले आहे. या अपिलातील सामनेवाले क्र. १२, १३ व १४ यांस या मे. न्यायालयामार्फत स्पिड पोस्टने नोटीस पाठविण्यात आली असता सदरच्या नोटीसचा अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झाला नाही. परंतु सदर सामनेवाले क्र. १२, १३ व १४ यांच्या पत्त्याची चौकशी करता सदर सामनेवाले क्र. १२, १३ व १४ हे त्याच पत्त्यावर राहत आहेत असे खात्रीलायक समजले. त्यामुळे या जाहिर नोटीशीने वर नमूद सामनेवाले क्र. १२, १३ व १४ यांस असे कळविण्यात येते की, या अपिलाची पुढील तारीख दिनांक ०९/०७/२०२६ रोजी नेमण्यात आलेली असुन, या नेमलेल्या तारखे दिवशी या मे. न्यायालयात सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे. सदर तारखेला स्वतः अथवा आपल्या कायदेशीर प्रतिनिधींमार्फत सुनावणीस समक्ष हजर राहुन आपण आपले म्हणणे, लेखी अगर तोंडी युक्तीवाद सादर करावा. अपिलाच्या सुनावणीस आपण हजर राहिला नाहीत तर आपले गैरहजेरीत सुनावणीचे कामकाज पूर्ण केले जाईल म्हणुन या जाहिर नोटीसीद्वारे सामनेवाले क्र. १२, १३ व १४ यांचेवर नोटीसीची बजावणी करणेत येत आहे, म्हणुन दिली जाहिर नोटीस.
आज दिनांक २९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
ठिकाणः मालवण
दिनांकः २९/०६/२०२६
**उपविभागीय अधिकारी (महसूल) उपविभाग कुडाळ**

**उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**

**नोंदणीकृत कार्यालयः** ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरमंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
**क्षेत्रिय कार्यालयः** ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4419210130000351/ 4419- अंबरनाथ | १.सुमित सुरेश थोरात, २. उज्वला सुमित थोरात, दोघे येथेः खोली क्र. २, १ ला मजला, शिव शक्ती बिल्डींग, महात्मा फुले नगर, मोहने, आंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, महाराष्ट्र – ४२११०२. दोघे येथे देखीलः डी. एस. ससाणे चाळ, महात्मा फुले नगर, मोहने, आंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे, महाराष्ट्र – ४२११०२. अनु. क्र. १ येथे देखील : सिक्युरिटी गार्डस बोर्ड, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा डी ३०१, ई ३०१, सानपाडा रेल्वे कॉम्प्लेक्स, सानपाडा, नवी मुंबई, ठाणे महाराष्ट्र – ४००७०५. अनु. क्र. २ येथे देखीलः प्रतीक्षा कलेक्शन, गोटूतमल जतीन शॉप, मोहने बाजार पेठ, गामा मस्जिद रोड, आंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र - ४२११०२ | ०५.०३.२०२५ / ०१.०३.२०२५ अनुसार रु. १३४२६६५.५७ | 13.01.2026 | Rs.748000/- Rs.74800/- |
| स्थावर मालमत्तेचे वर्णन : नोंदणीकरण जिल्हा ठाणे आणि नोंदणीकरण उप जिल्हा कल्याण, ठाणे ४२११०२ मधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील गाव मोहने, ता. कल्याण मधील कोकणे जनरल स्टोअर्स जवळ, फुले नगर, आंबिवली पूर्व येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २२, हिस्सा क्र. ४/२/२ आणि सर्वे क्र. २२, हिस्सा क्र. ४/२/२ ए वर बांधण्यात आलेल्या 'साई सृष्टी संकुल' म्हणून ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावरील ३२६ चौ. फू. चटई क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०४ चा सर्व खंड आणि भूखंड. मालमत्तेच्या सीमा पुढील प्रमाणे : पूर्वः खाजगी घर, पश्चिमः अंतर्गत रोड, उत्तरः खाजगी घर, दक्षिणः खाजगी घर, सुमित सुरेश थोरात आणि उज्वला सुमित थोरात ह्यांच्या मालकीचे. | | | | | |
| 2 | 4416210130000171/ 4416- कल्याण | १.श्री असगर नियामत अन्सारी, २. साना असगर नियामत अन्सारी. दोघांचा पत्ताः खोली क्र. ३०, सागर निवास चाळ, सोनाली नगर समोर, मुंब्रा, साउथ इंडियन बँक समोर, मुंब्रा, ठाणे, महाराष्ट्र ४००६१२. | ११.१०.२०२१/ ३०.०९.२०२१ अनुसार रु. १७१२५९६.०० | 29.04.2026 | Rs.1523000/- Rs.152300/- |
| स्थावर मालमत्तेचे वर्णन : ग्रामपंचायत आदिवली – ढोकाळीच्या हद्दीमधील गाव आदिवली – ढोकाळी, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथे वसलेल्या सर्वे क्र. ३३, हिस्सा क्र. १, सर्वे क्र. ३३, हिस्सा क्र. २, सर्वे क्र. ३२, हिस्सा क्र. ३ वर बांधण्यात आलेल्या "शिव शक्ती अपार्टमेंट" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या सी विंग च्या १ ल्या मजल्यावरील ५६० चौ. फू. (बिल्ट अप क्षेत्रफळ) असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. १०३ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ** :: ०२-०७-२०२६ आणि ३१-०७-२०२६ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक** :: ०२.०८.२०२६ रोजी ११.०० वा. ते सायं. ५.०० वा. पर्यंत
**लिलावाचा दिनांक आणि वेळ** :: ०३-०८-२०२६ रोजी स. ११:०० वा. ते दु. २:०० वा. दरम्यान
इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत).

बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१. (संपर्क तपशीलः अमोल जोशी : ७९००१२७५५५, चंद्रमोहन चौधरीः ८१०८८३८२८६.)

अटी आणि शर्ती : ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमत्ता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छूक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छूक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकार यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदार यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बँक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाणः महाराष्ट्र, दिनांक : ०१.०७.२०२६** **सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**